NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक २०.१०.२०२६ मंगळवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक १९.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०७ केसेसमध्ये ०७ ईसमावर कारवाई करून एकुण ६९,११० /–रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायद्यान्वये ०५ केसमध्ये ३० ईसमावर कारवाई करून एकुण १,७१,६००/–रू. चा मुद्देमाल जप्त केला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ६४ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये ३३ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये १२५ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये १०१ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये १६ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ०६ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये १४३ केसेस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये ०६ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ०३ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये ८६७ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे ११ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये १५ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,४२४ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ४,३१,१५०/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) ईमामवाडा पोलीसांची कामगिरी :– जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक १९.०८.२०२६ चे १८.५० वा. ते १९.५० वा. चे दरम्यान, ईमामवाडा पोलीसांचे पथकाला माहिती मिळाली की, श्रीकांत नगराळे यांचे राहते घरी प्लॉट नं. ३९५, चंदननगर, ईमामवाडा, नागपुर येथे जुगार खेळला जात आहे. अशा खात्रीशीर माहीतीवरून, पोलीस ठाणे हद्दीत, नमुद ठिकाणी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी क्र. १) श्रीकांत हिरालाल नगराळे, वय ४८ वर्षे, रा. प्लॉट नं. ३९५, चंदननगर, ईमामवाडा, नागपुर २) शाम सुर्यभानजी भोवते, वय ५० वर्षे, रा. चंदन नगर, कार्पोरेशन टॅक्स ऑफीस जवळ, ईमामवाडा ३) गोपाल प्रभाकरराव गुल्हाणे, वय ४८ वर्षे, रा. प्लॉट नं. १९८, दर्शन कॉलोनी, नंदनवन ४) प्रीतम पांडुरंग सादरकर, वय ६२ वर्षे, रा. जुनी रेल्वे लाईन जवळ, हरदास चव्हाण यांचे घराजवळ, ईमामवाडा, ५) गणेश अजाबराव घोडमारे, वय ४७ वर्षे, रा. विहीरगांव, हनुमान मंदीर जवळ, सक्करदरा, ६) अय्याज वल्द ऐफाज खान, वय ४३ वर्षे, रा. मोठा ताजबाग, सरताज कॉलोनी, सक्करदरा ७) कैलास हिरालाल नगराळे, वय ४२ वर्षे, रा. प्लॉट नं. ३९५, चंदननगर, ईमामवाडा, ८) अशोक गोपालराव कोलुरवार, वय ६० वर्षे, रा. प्लॉट नं. १०५,

चंदननगर, ईमामवाडा, ९) मनोज कैलास वानखेडे, वय ३५ वर्षे, रा. सावित्रीबाई फुले नगर, बोरकर यांचे घराजवळ, अजनी, १०) दिपक उर्फ विकसित रमेश शेवणे, वय ३५ वर्षे, रा. सावित्रीबाई फुले नगर, एकनगर, संत गाडगेबाबा मार्ग, अजनी, ११) जिवन गजानन खाडे, वय ५२ वर्षे, रा. जोगीनगर, गल्ली नं. १२, अजनी, १२) शुभम वसंता पांडे, वय २८ वर्षे, रा. आजनी, उमरेड रोड, पोस्ट कळमना, तह. कुही, जि. नागपुर १३) राजेंद्र जवाहरलाल गुप्ता, वय ५१ वर्षे, रा. दसरा रोड, काशीबाई देऊळ, कोतवाली, १४) राजकुमार भिमराव सोमकुंवर, वय ४५ वर्षे, रा. प्लॉट नं. ४६, मयुर एकता सोसायटी, समता नगर, १५) किशोर गंगाधर बन्सोड, वय ५१ वर्षे, रा. सोवित्रीबाई फुले नगर, अजनी १६) संताजी सुरेश शिंदे, वय ६२ वर्षे, रा. पार्वती नगर, गल्ली नं. ६, अजनी १७) शहजाद खान मोहम्मद खान, वय ४९ वर्षे, रा. ठाकुर प्लॉट, मोठा ताजबाग, सक्करदरा, १८) शेख फारूख शेख मेहबुब, वय ४५ वर्षे, रा. दहलीबाबा दर्गाह, ताजबाग, सक्करदरा, १९) सुरेंद्र कृष्णाजी नगराळे, वय ५० वर्षे, रा. चंदन नगर, रमाबाई गार्डन जवळ, ईमामवाडा, २०) अजय सुखदेवराव मते, वय ४० वर्षे, रा. भगवान नगर, अजनी, २१) शेख बिलाल शेख लाल, वय ४३ वर्षे, रा. दहेलीवाली अम्मा दर्गाह जवळ, ताजबाग, सक्करदरा २२) नवाज सिराज शेख, वय २२ वर्षे, रा. बिडीपेठ, अंशुल किराणा जवळ, ताजबाग, सक्करदरा, नागपुर हे सर्वजण ताश पत्यावर पैश्याची बाजी लावुन हार–जीतचा जुगार खेळतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन रोख १२,५८०/–रू., वेगवेगळ्या कंपनीचे ११ मोबाईल फोन, ताश पत्ते व ईतर साहित्य असा एकुण १,६८,५८०/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे ईमामवाडा येथे कलम ४, ५ महा. जुगार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपींना ताब्यात घेतलेले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती रश्मीता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री. महेश चव्हाण, सहा. पोलीस आयुक्त (सक्करदरा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. जयवंत पाटील, पोउपनि. आदीत्य मडावी, निखील चापले, पोहवा. संदीप बोरसरे, चंद्रशेखकर कौरती, पोअं. अतुल टिकले व अंमलदार यांनी केली.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे वाडी :– हद्दपार ईसमास शस्त्रासह अटक.

दिनांक १९.१०.२०२६ चे १७.३० चे सुमारास, वाडी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, वडधामना परिसर येथे काळ्या रंगाचा शर्ट व पॅन्ट घातलेला एक हद्दपार इसम फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव निखील प्रफुल्ल दुबे, वय २३ वर्षे, रा. प्लॉट नं. १८, वार्ड नं. ३, डोबी नगर, वडधामना, वाडी, नागपूर असे सांगीतले. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ४१९५/२०२६ दिनांक २०.०९.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोहवा. धर्मेंद्र यादव यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे आरोपीविरूध्द कलम १४२, १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे नंदनवन :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक १९.१०.२०२६ चे २१.०० वा. चे सुमारास, नंदनवन पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना चिटनविस नगर ते ताजबाग रोडवर एक ईसम हातात शस्त्र घेवुन धुमधाम करतांना दिसुन आला. त्याचे जवळ जात असतांना तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेवुन त्यास निशस्त्र केले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव यशपाल दयाराम गजघाटे, वय २९ वर्षे, रा. पवनसुत नगर, रमनामारोती, नंदनवन, नागपुर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी धारदार चाकु किंमती ५००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगून धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे पोहवा. अश्वीन सहारे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे पोउपनि. गोविंद दळवी यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

पोलीस ठाणे मानकापुर :— दिनांक १९.१०.२०२६ चे १५.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत, कोलते ले—आऊट, प्लॉट नं. २४, गोधनी येथे बांधकाम साईडचे दुसऱ्या माळ्यावर कामगार महीला नामे श्रीमती गुलाबो नरीलाल कुमरे, वय ६० वर्षे, रा. चमनटोला, छपारा, शिवनी (म.प्रदेश), ह.मु.— घटनास्थळी. ह्या काम करीत असतांना, त्यांचा अचानक तोल जावुन, त्या जमीनीवर खाली कोसळल्याने त्याचे डोक्याला मार लागुन त्या गंभीर जखमी झाला. त्यांचेसोबत काम करणारे यांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यास तपासून मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे पोउपनि. उध्दव पोखरकर यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.